## ॥ स्वामी समर्थ ॥

भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे

भि - ती कशाची उरात धरतो
ऊ - न सावली नियम जगाचे ॥

न - को अंतरुस परमात्म्याला
को - णी नाही त्याविना तुजला
स तत रहा तू नामस्मरणात ॥

मी - पणा नाही स्वामी चरणी
तु झे ना काही, माझे ना काही
झ्या - गीरदारी कुणा दाखवितोस ॥

पा - मर जीव हे सारे असती
ठी - क समजूनी राहे या जगाती
शी - घ्र धाव घे स्वामीचे पाशी ॥

आ - दरे वंदन करी स्वामी चरणी
हे - ची विनवितो मी सर्वांशी ॥

राजन चकके

